एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन
कार्यक्रमांतर्गत (Integrated Watershed
Management Programme : IWMP)
पाणलोट समितीच्या रचनेत बदल करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास व जलसंधारण विभाग,**
**शासन निर्णय क्र. एपाव्य २०१२/प्र. क्र.१०४/जल-८,**
मादामा कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई -४०००३२
**दिनांक : २७ सप्टेंबर, २०१२.**

**प्रस्तावना :**

विविध विभागामार्फत करण्यात येणाऱ्या जलसंधारण उपचारात एकसुत्रता आणण्याकरिता केंद्र शासनाच्या ग्रामीण विकास मंत्रालयाच्या भूसंसाधन विभागाने सामाईक मार्गदर्शक सूचना २००८ निर्गमित केलेल्या आहेत. त्यामध्ये परि. क्र. ६.३ अन्वये ग्रामसभेस पाणलोट समितीची स्थापना करण्याचे अधिकार दिले आहेत. सदर समितीचे सोसायटी नोंदणी नियम, १८६० प्रमाणे धर्मादाय आयुक्ताकडे नोंदणी करण्यात येते. सदर पाणलोट समितीवर अध्यक्ष व सचिव यांची नेमणूक करण्याचे अधिकार ग्रामसभेस देण्यात आलेले आहेत. पाणलोट समिती ११ सदस्यांनी (अध्यक्षासह) मिळून बनलेली आहे. ज्या पंचायतीमध्ये एकापेक्षा अधिक गावे समाविष्ट आहेत, ती ग्रामपंचायत संबंधित गावामधील पाणलोट विकास प्रकल्पाची व्यवस्था करण्यासाठी प्रत्येक गावाकरीता स्वतंत्र उपसमिती व ज्या ठिकाणी पाणलोट प्रकल्पामध्ये एकापेक्षा जास्त ग्रामपंचायतीचा समावेश होतो, त्या ठिकाणी प्रत्येक ग्रामपंचायतीकरीता स्वतंत्र समिती स्थापन करण्यात येते.

२. एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमातील एकूण रक्कमेपैकी ७५ टक्के (५६+१०+९) रक्कम गावाच्या कामावर किंवा पाणलोट प्रकल्पातील उपचारांवर खर्च होणार आहे. पाणलोटांच्या सविस्तर प्रकल्प अहवाला नुसार (Detail Project Report : DPR) विहीत उपचारांसाठी आवश्यक रक्कम पाहता, पाणलोटांच्या पूर्ण विकासासाठी सदर रक्कम पुरेशी होत नाही. त्यामुळे एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमामध्ये (IWMP) अभिसरणाद्वारे (Convergence) अन्य राज्य व केंद्रीय योजनांशी सांगड घालून अन्य योजनेतून IWMP साठी पुरक निधी मिळविणे जास्त फायदेशीर ठरणार आहे. त्यासाठी गावातील / ग्रामपंचायतीतील सदस्यांना पाणलोट समितीवर घेणे आवश्यक आहे. त्याद्वारे अभिसरणाची प्रकिया सुलभ होईल व ग्रामपंचायतीमार्फत अन्य योजनेद्वारे IWMP साठी पुरक निधी मिळून ग्रामपंचायत / गावाचा विकास साधला जाईल. त्यासाठी प्रत्येक पाणलोट समितीवर ३-४ ग्रामपंचायत सदस्यांची निवड करण्यात यावी, अशी बाब शासनाच्या विचाराधीन होती.

३. सामाईक मार्गदर्शक सूचनेनुसार ग्रामसभेस पाणलोट समितीचा अध्यक्ष निवडण्याचे अधिकार दिलेले आहेत. पाणलोट समितीची कार्ये पाहता, पाणलोट समितीस अधिक बळकटी देण्याकरिता व पाणलोट विकास कामांची व्यवस्थितरित्या / प्रभावीपणे अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने, संबंधीत सरपंच, ग्रामपंचायत यांना पाणलोट समितीचे अध्यक्षपद सोपविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :**

केंद्र शासनाच्या ग्रामीण विकास मंत्रालयाच्या भूसंसाधन विभागाने सुधारित सामाईक मार्गदर्शक सूचना २०११ निर्गमित केलेल्या आहेत. त्यामध्ये परि.क्र. ६.३ अन्वये ग्रामसभेस पाणलोट समितीची स्थापना करण्याचे अधिकार दिले आहेत. सदर समितीची सोसायटी नोंदणी नियम, १८६० प्रमाणे धर्मादाय आयुक्ताकडे नोंदणी करण्यात येते. पाणलोट समितीची कार्ये पाहता, पाणलोट समितीस अधिक बळकटी देण्याकरिता व जलसंधारण कामांची व्यवस्थितरित्या / प्रभावीपणे अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने, सरपंच, ग्रामपंचायत यांनाच पाणलोट समितीचे अध्यक्षपद सोपविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**त्यानुसार यापुढे राज्यातील एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम राबविणा-या ग्रामपंचायतीच्या पाणलोट समीतीवर अध्यक्ष म्हणून सरपंच, ग्रामपंचायत हे काम पहातील असा शासनाने निर्णय घेतलेला आहे.**

**या निर्णयानुसार पाणलोट समितीची सुधारित रचना :** खालीलप्रमाणे असेल.

१) पाणलोट समिती (WC) : अध्यक्ष : सरपंच, ग्रामपंचायत
२) पाणलोट समितीचे ३ सदस्य : ग्रामपंचायतीचे सदस्यामधून
३) पाणलोट समितीचे ४ सदस्य : स्वयंसहाय्यता गटांमधून ( महिला सदस्या किमान १)
४) पाणलोट समितीचे ४ सदस्य : उपभोक्ता गटांमधून ( महिला सदस्या किमान १)
५) पाणलोट समितीचा १ सदस्य : अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती समूह
६) पाणलोट समितीचा १ सदस्य : पाणलोट विकास गटाचा-कृषि/वन/सामाजिक वनीकरण प्रतिनिधी
७) पाणलोट समिती सचिव : ग्रामसभेने ठरविलेला

१) पाणलोट समीतीच्या अध्यक्षांचा कालावधी हा त्यांच्या सरपंच पदाच्या कालावधी एवढाच राहील.
२) पाणलोट समीतीमधील ग्रामपंचायतीचे सदस्य यांचा कालावधीही त्यांच्या सदस्यपदाच्या कालावधी एवढाच राहील.
३) सदर शासन निर्णय तात्काळ अंमलात येत असुन ज्या पाणलोट समित्यांचे अध्यक्षपदी सरंपचाव्यतिरिक्त ग्रामसभेने निवडलेली ग्रामपंचायती मधील अन्य व्यक्ती असतील त्या गावातील पाणलोट समित्यांचे त्यांचे अध्यक्षपद तात्काळ संपुष्टात येईल.
४) ज्या गावात पाणलोट समितीचे अध्यक्ष हे सरपंच आहेत अशा पाणलोट समितीच्या अध्यक्षपदी सरपंच हे त्यांच्या पदाच्या कालावधी पर्यत तसेच कायम राहतील.
५) पाणलोट समितीतील अन्य सदस्य व पाणलोट समितीचे सचिव हे पूर्वी नियुक्त केल्यानुसार त्यांच्या पदावर कायम राहतील.
६) पाणलोट समिती, अध्यक्ष व सचिवासह १५ सदस्यांची असेल.
७) पाणलोट समिती ही ग्रामविकास समितीची/ग्रामपंचायतीची उपसमिती म्हणून कार्य करेल.
८) ज्या पंचायतीमध्ये एकापेक्षा अधिक गावे समाविष्ट आहेत, ती ग्रामपंचायत संबंधित गावामधील पाणलोट विकास प्रकल्पाची व्यवस्था करण्यासाठी प्रत्येक गावाकरिता स्वतंत्र उपसमिती स्थापन करील.
९) ज्या ठिकाणी पाणलोट प्रकल्पामध्ये एकापेक्षा जास्त ग्रामपंचायतीचा समावेश होतो, त्या ठिकाणी प्रत्येक ग्रामपंचायतीकरीता स्वतंत्र पाणलोट समिती स्थापन करण्यात येईल.
१०) पाणलोट समितीचे अध्यक्ष यांच्याकडून कर्तव्यात कसूर, दुर्लक्ष, योजनेच्या अंमलबजावणीत मंदगती, योजनेत अफरातफर गैरव्यवहार आढळल्यास, चौकशी अंती अध्यक्षास पदावरून काढून टाकण्याचे अधिकार मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ कलम ३९ नुसार विभागीय आयुक्त यांना राहतील.
११) पाणलोट समितीचे अध्यक्ष दीर्घ आजारी पडल्यास अथवा शारिरीक दृष्ट्या अकार्यक्षम झाल्यास उपसरपंच हे पाणलोट समितीच्या अध्यक्षपदाची कामे पाहतील.
१२) पाणलोट समितीची बैठक दरमहा घेण्यात यावी.

**पाणलोट समितीची कार्ये :**

१. प्रकल्पांतर्गत निवडलेल्या गावांचे प्रकल्प नियोजन नेटप्लॅनिंग व्दारे करून, प्रकल्प आराखडे तयार करण्यास कृषि / वन विभाग / सामाजिक वनीकरण / संबंधित शासकीय विभाग, स्वंयसेवी संस्थेस (NGO), पाणलोट विकास पथकास आणि प्रकल्प कार्यान्वयन अभिकरणास पाणलोट समिती सहाय्य करेल.
२. सविस्तर प्रकल्प अहवालानुसार (DPR) मंजूर उपचार कामांची अंमलबजावणी करणे.
३. पाणलोट कामाची देखभाल व दुरूस्ती करणे. केल्या जाणाऱ्या कामांच्या नोंदी करणे व संपूर्ण अभिलेख जतन करणे, हिशोब ठेवणे या कामाची जबाबदारी संबंधित समितीची राहील.
४. गरजेनुसार निधीची मागणी करणे - पाणलोट विकासाची कामे जलदगतीने करणे.
५. प्रत्येक तीन महिन्यांत झालेल्या कामाचा तपशील व खर्च ग्रामसभेसमोर सादर करणे.

६. समितीच्या लेख्यांचे वार्षिक विवरण व कामकाज दैनंदिन सोईसाठी स्वतंत्रपणे ठेवण्यांत यावे.
७. वितरीत निधीतून पाणलोट विकासाची कामे वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे करण्यात यावीत. पाणलोटांतर्गत झालेल्या कामाची देयके वेळेत अदा करण्याची जबाबदारी पाणलोट समितीची राहील.
८. पाणलोट समितीला मृद व जल संधारण तसेच वनीकरण कामातील नियोजन व अंमल बजावणी सल्ला / मदतीसाठी गरजेनुसार संबंधी शासकीय यंत्रणेचे (कृषि, वने, लघुपाटबंधारे इत्यादी) निमशासकीय यंत्रणा / जिल्हापरिषदेचे ग्रामस्तर अधिकारी / कर्मचारी विशेष आमंत्रित म्हणून पाणलोट समितीत सहभागी करण्यांत येईल. परंतु संबंधीत विशेष निमंत्रितांना मतदानाचा अधिकार रहाणार नाही.
९. पाणलोट समिती, पाणलोट विकास पथकाच्या सहाय्याने शेतकरी, भूमीहीन / मत्ता नसलेले गरीब कृषि मजूर, स्त्रिया, धनगर, व अनुसूचित जाती / अनुसूचित जमातीच्या व्यक्तींमधून पाणलोट क्षेत्रामध्ये स्वयंसहाय्यता गट (Self Help Groups : SHGs) स्थापन करेल. हे गट एकजिनसी गट असतील व त्यांची ओळख व हितसंबंध सामाईक असतील ते त्यांच्या उपजिविकेकरीता पाणलोट क्षेत्रावर अवलंबून असतील.
१०. पाणलोट समिती, पाणलोट विकास पथकाच्या सहाय्याने पाणलोट क्षेत्रामध्ये उपभोक्ता गटांची (User Groups:UGs) देखील स्थापना करण्यास सहभाग घेईल. प्रत्येक काम / कार्यक्रमामुळे जास्त प्रमाणात बाधीत झालेल्या आणि पाणलोट क्षेत्रामध्ये जमीन असलेल्या व्यक्तींचे हे एकजिनसी गट असतील. प्रत्येक उपभोक्ता गटामध्ये विशिष्ट पाणलोट क्षेत्रातील काम अथवा कार्यक्रम या पासून ज्यांना प्रत्यक्ष फायदा होण्याची शक्यता आहे अशा व्यक्तींचा समावेश असेल. प्रकल्पांतर्गत निर्माण झालेल्या सर्व मत्तांच्या प्रवर्तनासाठी व देखभालीसाठी ग्रामपंचायत व ग्रामसभा यांच्या सहयोगाने उपभोक्ता गट जबाबदार असेल.
११. प्रकल्पातर्गत वेगवेगळया योजनांची सांगड (Convergence of Scheme) घालण्यासाठी पाणलोट समिती समन्वय / सहभाग घेईल.

**पाणलोट समिती सचिवांच्या जाबाबदाऱ्या :**

१. पाणलोट क्षेत्र विकास प्रकल्पाच्या संदर्भातील निर्णय घेण्याच्या प्रक्रियेमध्ये सहभागी होण्याकरिता ग्रामसभा आयोजित करण्यासाठी ग्रामसेवकास कळविणे. पाणलोट समितीच्या प्रत्येक बैठकीमध्ये मागील खर्चाचा आढावा, झालेला खर्च योग्य आहे का याची तपासणी बँक खातेपुस्तकावरून करणे . तसेच झालेला खर्च व नोंदविलेला खर्च बरोबर आहे का याबाबतचे सर्व दस्ताऐवज पाणलोट समितीच्या बैठकीत सादर करणे. पाणलोट समिती बैठक बोलावण्यासाठी सभेची नोटीस ८ दिवस अगोदर काढणे.
२. बैठकीतील निर्णयांच्या अनुषंगाने कार्यवाही बाबत पाठपुरवा व समन्वय करणे.
३. पाणलोट समिती (Watershed Committee : WC) व पाणलोट विकास प्रकल्पाकरिता असलेल्या इतर संस्था यांच्या बैठकांमधील कार्यवाही बाबतचे सर्व अभिलेख अद्ययावत ठेवणे.
४. वेतन व इतर वित्तीय व्यवहारांची नोंद करणे.
५. **पाणलोट समितीच्या वतीने पाणलोट विकास पथकातील कृषि / सामाजिक वनीकरण / वन विभागाच्या निर्देशित व्यक्ती बरोबर धनादेशावर संयुक्त स्वाक्षरी करणे.**
६. कामाची आखणी करणे , कामे करून घेणे व कामावर देखरेख ठेवणे.
७. प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणेच्या सूचनेप्रमाणे मंजूर सविस्तर प्रकल्प अहवालानुसार प्रकल्पातील कामाची अंमलबजावणी करणे. तसेच आवश्यक ती माहिती उपलब्ध करून देणे.
८. प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणेच्या निर्देशानुसार सचिव कार्यक्रमाच्या अंमलबजावणीमध्ये भाग घेईल.
९. उपभोक्ता (UGs) व स्वंयसहाय्य गटांना (SHGs) त्यांचे लेखे ठेवण्यास मदत करणे.
१०. लेखाविषयक ठरवून दिलेले सर्व दस्ताऐवज अद्ययावत ठेवणे. तसेच पाणलोट समिती कार्यालयास सचिव हा पूर्ण जबाबदार असेल.

सचिव यांनी गैरवर्तन / गैरप्रकार / बेजबाबदार वर्तन केल्याचे दिसून आल्यास किंवा काम समाधानकारक नसल्यास त्यांना कामावरून काढून टाकण्याचा अधिकार पाणलोट समितीस राहील. गैरवर्तन करणाऱ्या पाणलोट

समिती सचिवावर पाणलोट समिती कारवाई करीत नसेल तर प्रकल्प कार्यान्वयीन अभिकरण पाणलोट समिती सचिवावर कारवाई करण्यास सक्षम राहील.

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक **२०१२०९२७१०४५३२१२०२** असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(सुनील चव्हाण)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रति,
मा.मंत्री (जलसंधारण), यांचे खाजगी सचिव
मा.राज्यमंत्री, (जलसंधारण) यांचे खाजगी सचिव
सचिव, केंद्रीय ग्रामीण विकास मंत्रालय (भूसंसाधन विभाग ) निर्माण भवन, नवी दिल्ली.
सह सचिव, केंद्रीय ग्रामीण विकास मंत्रालय (भूसंसाधन विभाग ) ब्लॉक क्र ११, ६ वा मजला सिजिओ कॉम्प्लेक्स, लोधीमार्ग, नवी दिल्ली.
मुख्य सचिव यांचे सहसचिव,
सर्व अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालयीन विभाग
सर्व विभागीय आयुक्त,
आयुक्त (कृषि) तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा राज्यस्तरीय पाणलोट विकास यंत्रणा,महाराष्ट्र राज्य, पुणे,
प्रधान मुख्य वनसंरक्षक व महासंचालक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
मुख्य वनसंरक्षक व उप महासंचालक, सामाजिक वनीकरण वृत्त, नागपूर,
महासंचालक,माहिती व जनसंपर्क, मंत्रालय, मुंबई (प्रसिध्दीकरिता)
वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणेचे सर्व प्रतिनिधी,
सर्व जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, पाणलोट कक्ष तथा माहिती केंद्र (WCDC)
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी / अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद,
संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, महाराष्ट्र राज्य, पुणे,
सर्व संचालक, कृषि आयुक्तालय, पुणे,
संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे,
संचालक, महाराष्ट्र सुदूर संवेदन केंद्र, नागपूर,
सर्व विभागीय कृषि सहसंचालक,
सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,
सर्व सह संचालक, सामाजिक वनीकरण वृत्ते,
सर्व उप संचालक, सामाजिक वनीकरण,
सर्व तालुका कृषि अधिकारी,
प्रमुख मार्गदर्शक, महाराष्ट्र राज्य जलसंधारण सल्लागार परिषद,
सर्व सदस्य महाराष्ट्र राज्य जलसंधारण सल्लागार परिषद,
सर्व उप सचिव/ अवर सचिव/कार्यासन अधिकारी, ग्राम विकास व जलसंधारण विभाग , मंत्रालय, मुंबई - ३२.
जल-८ (निवड नस्ती), ग्रा.वि.व ज.सं.विभाग, मंत्रालय, मुंबई.